An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

# AJANTA

Volume - IX, Issue - I, January - March - 2020
ISSN - 2277 - 5730
Impact Factor - 6.399 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. राजेंद्र विठ्ठलराव घोनमोडे

In Recognition of the Publication of the Paper Entitled

राष्ट्रविकासात राष्ट्रसंतांचे ऐतिहासिक योगदान

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Ajanta Prakashan, Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 8390984760 Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

2019 - 20

VOLUME - IX, ISSUE - I – JANUARY - MARCH - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १८. राष्ट्रविकासात राष्ट्रसंतांचे ऐतिहासिक योगदान

**प्रा. डॉ. राजेन्द्र विठ्ठलराव घोनमोडे**
सहाय्यक प्राध्यापक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, ज़ि. गडचिरोली.

विसाव्या शतकाचा कालखंड हा भारत राष्ट्राच्या नवनिर्माणाचा महत्त्वपूर्ण कालखंड होता. या अत्यंत कसोटीच्या कालखंडाची जडणघडण करण्यात अनेकानेक भारतीय राष्ट्रपुरूषांची प्रज्ञा आणि प्रतिभा खर्ची पडली. विचारवंत, तत्त्वज्ञ, समाजकारणी, कवी – लेखक – कलावंत, तंत्रज्ञ – शास्त्रज्ञ आदी अनेकांनी मिळून नवभारताच्या नवषिल्पाची रचना करण्याचा प्रयत्न केला. अध्यात्म आणि विज्ञान, पौर्वात्य आणि पाश्चात्य यांच्या सम्यक समन्वयातून आपला देश घडत गेला. एक राष्ट्र म्हणून भारत नव्याने घडवताना ज्या प्रज्ञा पुरूषांनी आपल्या जीवनसर्वस्वाचा होम केला त्यापैकी एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.[1]

लहानपणापासूनच तुकडोजी महाराजांवर आध्यात्मिक विचारांचा प्रभाव होता. आडकोजी बाबाचे ते भक्त होते. आडकोजी बाबा समाधिस्त झाल्यामुळे त्यांच्या मनात विरक्ती निर्माण झाली आणि वयाच्या 15 व्या वर्षी ते घर सोडून रामटेकच्या जंगलात तपष्चर्चा करू लागले. त्यानंतर वयाच्या सतराव्या वर्षी इ.स. 1926 मध्ये ते चिमुरला आले. या परिसरात ते देवबाबा म्हणून प्रसिद्ध झाले. गोंदोडा–नेरी, चिमूर परिसरातील पाचपन्नास गावात भ्रमण आणि भजन करीत 25 जुलै 1926 रोजी त्यांनी चिमूर येथे माणिक प्रासादिक बालसमाजाची स्थापना केली. लोकसंघटनचे प्रथम पाऊल त्यांनी चिमूर येथेच रोवले. 1930 च्या काळात देषात अनेक सामाजिक व राजकीय चळवळी सुरू झाल्या होत्या. त्या चळवळींकडे वंदनीय महाराजांनी आपली ओझरती दृष्टी टाकली आणि आपल्या स्वतंत्र वृत्तीने स्वतंत्रपणे कार्य करण्याची मनोमन प्रतिज्ञाच केली.[2]

देषभक्ती, समाजभक्ती आणि राष्ट्रभक्ती वंदनीय राष्ट्रसंताच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. या देषातील माणसाचा स्वभावच देवभक्तीमध्ये तल्लीन होण्याचा आहे. त्यांचे भावविष्व परमेष्वराने व्यापून टाकले आहे. सामान्य उपासकाला सामुदायिक प्रार्थनेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सहजपणे देवभक्तीतून समाजभक्ती व राष्ट्रभक्तीकडे घेऊन जातात. राष्ट्रसंतानी हिंदुस्थानच्या प्राचीन परंपरेला युगानुकूल बनवून समाज प्रबोधन केले. संस्कृती ही राष्ट्राची ओळख असते. राष्ट्रसंताच्या राष्ट्रजागरणाचा हाच मुख्य आधार आहे. प्रार्थनेचा शेवट ''भारत माता की जय'' या घोषनेने होतो. रोज भारत मातेचा जयजयकार ''माता भूमिः पुत्रोहम प्रधिव्या!'' अथर्ववेदातील पृथ्वीसुक्तात मातृत्वाची भावना प्रगट केली आहे. बंकीमचंद्राचे ''वंदे मातरम्'' मातृभूमीच्या प्रती व्यक्त होणारी श्रद्धा देषभक्ती निर्माण करीत असते. नेरी, चिमुरच्या भागातील गोंदोडा ही वंदनीय तुकडोजींची तपोभूमी राहिलेली आहे. इ.स. 1932 ला त्यांनी चिमुरला सत्याग्रहींसमोर जे भजन म्हटले त्यामधून भारताच्या प्राचीन राष्ट्रीयतेचा परिचय करून दिला.[3]

''प्यारा हिंदुस्थान है, गोपालोंकी शान है,
विरोंका मैदान इसमें भक्तोके भगवान है।
आवो इसे जगाएंगे, भारत को बदलाएंगे,
बालविरों उठो तुम तो ऋषियोंकी संतान है।''

Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli